ISSN 2278-8808
SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पर्यटन विकास आणि संग्रहालय वात्स्यल्य संग्रहालय वेळास- मंडणगड

विजय अनंत कुलकर्णी, Ph. D.
प्राचार्य, मंडणगड कॉलेज, मंडणगड. जिल्हा रत्नागिरी.

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

प्रस्तावना :-

निसर्ग सौंदर्य आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या कोकणातील रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड पासून सुमारे ३५ कि.मी.अंतरावरील पूर्णपणे समुद्रकिनारी वसलेले टुमदार असे ए क कोकणी पद्धतीचे वेळास हे एक छोटेसे गाव. ३५० घरे,१७०० लोकवस्ती असून सावित्री नदी आणि अरबी समुद्राच्या संगमावर असलेल्या बाणकोट पासून पाच कि.मी. दूर आहे . सिद्दींच्या प्रभावाखाली असलेला बाणकोट ब्रिटीशांच्या ताब्यातील कोकणातील पहिले बंदर आहे. मंडणगड-देव्हारे-वेस्वी-बाणकोट-वेळास असा हा ३५ कि.मी. चा मार्ग आहे.



वेळास हे गाव पेशवाईतील मुत्सुद्दी नाणं फडणवीस यांचे आजोळ आहे. या ठिकाणी महाजनांचा वाडा असून या वाड्यात त्यांचा जन्म झाला असे सांगितले जाते.सध्या या ठिकाणी एक चौथरा असून त्या वर नाना फडणवीस यांचा अर्धपुतळा आहे.



**उद्देश :-**

वारसा जतन-संवर्धन,ज्ञान, शिक्षण,संशोधन आणि मनोरंजन ही संग्रहालयांची उद्दिष्टे सर्वश्रुत आहेत.तथापि पर्यटन व्यवसायाला पुरक आणि चालना या दृष्टीने सुद्धा त्यांना महत्व आहेच.म्हणूनच संग्रहालयांची निर्मिती –उभारणी आजही काळाची गरज आहे.

वेळास आणि कासव महोत्स :-

वेळास येथे सह्याद्री निसर्ग मित्र मंडळ(चिपळूण) आणि येथील ग्रामस्थ यांनी २००६ पासून पर्यटनाला चालना म्हणून 'कासव महोत्स'वाला सुरवात केलेली आहे. olivo ridle या प्रजातीची मादी समुद्र किनारी अंडी घालते ती शोधून एका विशिष्ट ठिकाणी वाळूखाली ठेवली जातात आणि सुमारे ६० दिवसांनी पिल्ले बाहेर आली कि ती सुखरूपपणे समुद्रात सोडणे असे या महोत्स्ववाचे स्वरूप आहे.साधारणपणे जानेवारी ते एप्रिल या काळात हा महोत्सव आसतो.यातून पर्यटनाला चालना मिळालेली आहे. home stay हि संकल्पना पुढे येवुन ३० घरांमध्ये पर्यटकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.



संग्रहालयांच्या निर्मितीची गरज :-

केवळ सागरी पर्यटन आणि कासव महोत्सव या पेक्षा पर्यटकांचे आकर्षण अधिक वाढावे यासाठी ग्रामस्थाची बैठक २०१४ मध्ये झाली. गावातील जुन्या घरांमध्ये असलेल्या जुन्या असलेल्या परंतु आता कालबाह्य झालेल्या वस्तूंचा संग्रह करावा आणि त्यातून एक संग्रहालय निर्माण करावे हि कल्पना पुढे आली.जुन्या वस्तूंची माहिती,त्यांचा उपयोग,त्यांची स्थानिक नावे आणि त्यातून नवीन पिढीला जुन्या कोकणचे दर्शन व्हावे या हेतूने जाने.२०१६ पासून वेळास येथे एक लहान परंतु उपयुक्त असे " वात्स्यल्ल्य " या नावाने संग्रहालय सुरु करण्यात आले.

वेळास येथील पाचव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे श्री. अमोल अनंत सोमण यांनी आपल्या राहत्यापारंपारिक जुन्या घरात हे संग्रहालय सुरु केलेले आहे .याच घरात home stay हि सुविधा आहे. घरी आलेल्या पर्यटकांना त्याचा लाभ मिळत आहे.याच बरोबर मसाल्याच्या पदार्थांची बाग ,कोकणी पदार्थांची विक्री याची जोड त्यांनी दिलेली आहे.

श्री अमोल सोमण हे मंडणगड महाविद्यालयाचे माजी विद्यर्थी असून मार्च १९९९ मध्ये ते अर्थशास्त्र विषयाचे पदवीधर आहेत. पदवी नंतर त्यांनी पर्यटन क्षेत्राकडे वळले आणि आज याच व्यवसायात जम बसविलेला आहे.त्यांचे हे संग्रहालय वैयक्तिक वा खाजगी या प्रकारात असून त्यांच्या संग्रहालयातील काही वस्तूंची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

वात्सल्य संग्रहालयातीलकाही वैशिष्टयपूर्ण वस्तूंची नावे, उपयोग आणि फोटो :-

**01**) घरत :-

जात्यापेक्षा मोठे असलेले दोन दगडी पेड म्हणजे घरत होय.भातापासून तांदूळ करण्यासाठी घरताचा पूर्वी उपयोग केला जात असे.वरच्या पेडला लाकडी खुंटा असून मद्ध्यभागी असलेल्या लाकडात (पायली)छिद्रात बांबूची काठी असून ती लाकडाच्या पट्टीने जोडून (वाक) भरडलेला भात घरतात टाकून ते उभ्याने गोलाकार फिरवून तांदूळ निघत असे.



**02)** लाकडी पुरण यंत्र : -

गावोगावी देव/देवीच्या पालख्या असतात.देवाला नेवैद्य म्हणून पुरण वा पुरण पोळी ही प्रथा आहे. गावजेवणासाठी मोठ्या प्रमाणात पुरण लागत असते.त्यासाठी लाकडी पुरण यंत्राचा वापर केला जात असे.शिजवलेली डाळ त्यात टाकून ते यंत्र फिरवून पुरण केले जात असे



**03 )** हात रहाट : -

पूर्वीच्या काळी वीज नसल्याने विहिरीतून पाणी काढण्यासाठी शिसवी लाकडाचा हात रहाट वापरला जाई



**04)** डालगे **:-**

अंगण / परसदार स्वच्छ केल्यानंतर पालापाचोळा उचलण्यासाठी बांबूपासून विणलेले साधन म्हणजे डालगे होय. तो हस्तकलेचा छान नमुना आहे



**05)** रांजण : -

चीनी मातीचे उभे गोल आकाराचे  मीठ ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे भांडे होय. उन्हात वाळवलेले मीठ यात ठेवले जात कि जे अनेक दिवस  वापरता येत असे.



**06)** थारल :-

स्वयंपाकघराच्या खिडकीत चूल मांडून त्यात निखारे ठेवले जावून त्यावर उष्णतेची गरज असणारे दूध सारखे पदार्थ ठेवले जात असत.खिडकीला लाकडी- लोखंडी गज असून बाहेरील बाजूस जाळी असते या जाळीतून धूर बाहेर जाई.



**07)** मोरावली :-

आयताकृती लाकडी पाटाच्या पुढील बाजूस धार असलेले एक पाते कि ज्याच्या मदतीने फणस अन्य भाज्या चिरल्या जात.



**08)** द्रोण :-

गोठ्याच्या बाहेर गाई-गुरांना लागणारे पिण्याचे पाणी साठवण्या साठी जांभा दगडात खड्डा कोरून केलेली वस्तू म्हणजे द्रोण होय.त्याच्या तळाशी साफसफाई करण्यासाठी मोठे छिद्र असून त्यात लाकूड अडकविलेले असते.



**09)** माथ्या :-

म्हणजे मोठी लाकडी रवी होय. ताक –लोणी करण्यासाठी दोरीत अडकविलेल्या माथ्याने दही घुसळले जाई.त्यासाठी माथ्याचे २२ फेरे झाले कि ताकावर लोणी येते.



**10)** कोठार : -

सागवानी लाकडाचा सांगाडा की ज्याच्या सर्व बाजूनी फणसाच्या फळया ठोकून तयार केलेली मोठी चौकोनी वा आयताकृती पेटी म्हणजे कोठार होय.यात साठवलेले धान्य काढण्यासाठी वरच्या बाजूला एक दरवाजा असतो.

या व्यतिरिक्त मोठे जाते,लहान जाते (जातुली), पाटा-वरवंटा,खलबत्ता,दगडी रगडा, लाकडी पेटी-सन्दुक,सागवानी पाळणा,लाकडी नांगर,भरड काढण्याचे शीन, देवघर, चौरंग, मापटी, खवणी, कळशी-तपेले-घागर, मोदकपात्र, प्रवासी-फिरकीचा तांब्या, सहान-खोड,लाकडी/दगडी उखळ-मुसळ, चोपण,लाकडी डेस्क,अशा अनेक जुन्या वस्तू या संग्रहालयात आहेत.

-

## काही अन्य छायाचित्रे :-

| | | |
|---|---|---|
|  | |  |
|  | |  |
|  | |  |

-

समारोप :-

ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या कोकणात पर्यटन क्षेत्राची वाढ होत आहे . केवळ पर्यटनावर अवलंबून न राहता त्याला संग्रहालयाची जोड दिली तर संग्रहालयाचे उद्देश साध्य होऊन पर्यटन आणि संग्रहालय चळवळ यांचा एकत्रित विकास होण्यास निश्चीत मदत होईल.